# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१** **दि. ८ मे, २०२१**

**(कृपया, आपल्या दनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)**

जळगाव दि.८ (प्रतिनिधी) कोरोनामुळे मृत्युत झालेली वाढ पाहता जळगाव शहराच्या स्मशानभूमीत गरजू व निराधारांना अत्यंविधीसाठी लाकडे कमी पडू नये यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने परिसरातील अनगड व जळाऊ लाकडे जळगाव महानगरपालिकेकडे मोफत सुपूर्द केली आहेत. अंदाजे ही १५० ते २०० टन लाकडे असण्याची शक्यता आहे.

कोरोनाच्या या उदभवलेल्या सद्यस्थितीत स्मशानभूमीत लाकडे कमी पडू नयेत यासाठी प्रभारी कुलगुरु प्रा.ई.वायुनंदन यांच्या पुढाकाराने विद्यापीठाने सामाजिक बांधिलकीच्या नात्याने विद्यापीठ परिसरातील जळाऊ लाकडे महानगरपालिकेकडे मोफत सुपूर्द करण्याचा निर्णय घेतला. विद्यापीठाच्या ६५० एकरच्या परिसरात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. यातील कोसळलेली किंवा वाळलेली झाडे एकत्रित करुन ठेवली होती. त्यामध्ये निम, गुलमोहर, सुबाभूळ, निलगिरी तसेच काही काटेरी वृक्षांचा समावेश आहे. जळगाव महानगरपालिकेशी विद्यापीठाने पत्रव्यवहार केला व स्मशानभूमीच्या दैनंदिन कामासाठी ही लाकडे मोफत देण्याची तयारी दर्शविली. महानगरपालिकेनेही त्याला प्रतिसाद दिला व त्यानुसार महानगरपालिकेच्या वाहनाने ही लाकडे उचलण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

शनिवारी महापौर जयश्री महाजन, उपमहापौर कुलभूषण पाटील, महानगरपालिकेचे आयुक्त सतिश कुलकर्णी, माजी महापौर तथा सिनेट सदस्य व नगरसेवक विष्णू भंगाळे यांनी विद्यापीठाला भेट दिली व विद्यापीठ प्रशासनाला आभाराचे पत्र दिले. संकटाच्या काळात विद्यापीठाने पुढाकार घेऊन सामाजिक ऋण म्हणून मोफत लाकडे पुरविल्याबददल महापौर व आयुक्तांनी विद्यापीठाचे मनापासून आभार मानले. यावेळी महापौर जयश्री महाजन, उपमहापौर कुलभूषण पाटील, आयुक्त सतीश कुलकर्णी, विष्णू भंगाळे, महानगरपालिकेचे अभियंता अरविंद भोसले व श्री. सोनगिरे यांचे विद्यापीठाच्यावतीने स्वागत करण्यात आले. त्यावेळी प्रभारी प्र-कुलगुरु प्रा.बी.व्ही.पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य दीपक पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ.एस.आर. भादलीकर, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी एस.आर.गोहिल, परीक्षा मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील, विद्यापीठ अभियंता आर.आय.पाटील, कनिष्ठ अभियंता पी.टी.मराठे, उद्यान अधिक्षक अश्विनी पाटील, आदी उपस्थित होते.

-----------------------------------------------------------------------------------------------------------

## सामाजिक बांधिलकीच्या नात्याने मदत : प्रा.ई.वायुनंदन

**विद्यापीठाच्या परिसरात गेल्या दोन वर्षापासून वाळलेली व कोसळून पडलेल्या झाडांची लाकडे एकत्र करुन ठेवण्यात आली होती. सध्या कोरोनाच्या काळात मृतांची संख्या वाढली असून स्मशानभूमीत लाकडे कमी पडू नयेत यासाठी विद्यापीठाने जळगाव महानगरपालिकेला ही सर्व लाकडे मोफत देण्याचा निर्णय घेतला. हे विद्यापीठ संकटाच्या काळात समाजाच्या मदतीला नेहमीच धावून जात असते. तोच पायंडा यावेळी देखील कायम ठेवण्यात आला.**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या जळगाव, धुळे व नंदूरबार या तीन जिल्ह्याच्या आवृत्तीतून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी